नवराष्ट्र मुंबई, ९ एप्रिल २०१९

# मुंबईकर निघाले जगप्रवासाला

## व्यावसायिक प्रवीण मेहता आणि डॉक्टर सुधीर बलदोटा यांची शांतता यात्रा

मुंबई: एक आगळा आणि अभूतपूर्व असा विक्रम मुंबईतील व्यावसायिक प्रवीण मेहता आणि त्यांचे मित्र डॉक्टर सुधीर बलदोटा यांनी नुकताच हाती घेतला आहे. त्यांनी कारमधून साठ देशांच्या जागतिक प्रवासाला सांताक्रूझ येथील 'रोटरी क्लब ऑफ बॉम्बे वेस्ट'च्या कार्यालयापासून ८ एप्रिलला सुरुवात केली आहे. ते आशिया, युरोप, दक्षिण अमेरिका आणि उत्तर अमेरिका या उपखंडांमधून प्रवास करत ३०० दिवसांमध्ये ७०००० किलोमीटरचा टप्पा पूर्ण करणार आहेत. 'जग जोडा, शांतता अनुभवा, जीवन साजरे करा' हा त्यांच्या जगप्रवासामागील संदेश असल्याचे सांगितले जात आहे. या प्रवासादरम्यान हे दोघे विविध देशांमधील १२० मान्यवरांना भेटणार आहेत.



या मान्यवरांमध्ये समाजासाठी बहुमूल्य काम केलेल्यांचा समावेश आहे. मेहता व बलदोटा अशा लोकांना भेटणार आहेत की जे राजकारणी किंवा सेलिब्रिटी नाहीत तर ते विविध समाज स्तरांवर काम करणारे आणि इतरांसाठी प्रेरणा ठरणारे सर्वसामान्य आहेत.

- शास्त्रज्ञ, संशोधक, कलाकार, सामाजिक व्यावसायिक, सामाजिक कार्यकर्ते, रेडिओ जॉकी, लेखक, शिक्षक किंवा समाजामध्ये प्रगती घडवून आणणाऱ्या व्यक्तिंना ते भेटणार आहेत.
- रोटरी क्लब ऑफ बॉम्बे वेस्टने या उपक्रमाला पाठबळ दिले असून ही एक 'परिवर्तनाच्या मार्गावरील यशोगाथा' आहे. असे त्याचे वर्णन केले आहे. प्रवीण मेहता यांनी चंदीगड ते स्पिती व्हॅली ते मनाली ते पुन्हा चंदीगड असे १००० किलोमीटरचे अंतर मोटर बाईकवरून पूर्ण केले आहे.
- चंदीगड ते लेह मनाली लेह आणि पुन्हा चंदीगड हे ११०० किमीचे अंतर तसेच मुंबई, कन्याकुमारी, चेन्नई, बेंगलोर ते पुन्हा मुंबई हे ४५०० किमीचे अंतर त्यांनी असेच पार केले होते. डॉक्टर सुधीर यांनी एव्हरेस्ट बेस कॅम्प, अन्नपूर्णा बेस कॅम्प, स्टोक कांगरी आणि जगतसुख पर्वत असे अनेक पर्वतट्रेक केले आहेत.